अंध/अस्थीव्यंग /कण्याच्याविकाराने पिडीत/
मुकबधीर कर्मच-यांना विशेष वाहतुक भत्ता
मंजूर करणेबाबत

जिल्हा परिषद अहिल्यानगर
शिक्षण विभाग (प्राथमिक)
आदेश क्र.कार्या-४/अपंग वहातुक भत्ता /१४८/२०२६
अहिल्यानगर दिनांक ०६/१०/२०२६

**वाचा** - १.शासन परिपत्रक क्र.वाहभ/१३००/प्र.क्र./सेवा-५/दि.४ जुन २००१
२.शासन निर्णय क्र.वित्त विभाग वाहभ क्र.१००३/प्र.क्र./सेवा-५/ दि.२/८/२००४
३.शासन निर्णय क्र.डिएसआर/२००८/प्रक्र./१२९/आस्था-५/दि.२७/५/२००९
४.शासन निर्णय क्र.वित्त विभाग वाहभ/२००९/प्र.क्र.७८/सेवा-५/दि.५/४/२०१०
५.शासन निर्णय क्र.वाहभ/२०१४/प्रक्र./सेवा-५/दि.३ जुन २०१४
६.शासन निर्णय क्र.वाहभ/२०१४/प्रक्र.१६/सेवा-५/दि.१० ऑगस्ट २०१५
७.शासन परिपत्रक क्र.वाहभ/२०१२/प्रक्र.२८/सेवा-५/ दि.०३ एप्रिल २०१७
८.शासन परिपत्रक क्र.वाहभ/२०१४/प्रक्र.१६/सेवा-५ दि.१८ एप्रिल २०१७
९.शासन परिपत्रक क्र.अप्रवि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६/ दि.१४ सप्टेंबर २०१८
१०.शासन निर्णय क्र.वाहभ/२०२०/प्र.क्र.३/२०२०/सेवा -५ दि.२०एप्रिल २०२२
११.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.अहमदनगर यांचेकडील अधिकार प्रदान आदेश साप्रवि-१/रवका/६९६/२०१६ दि.१७/६/२०१६
१२.गटशिक्षणाधिकारी,पंचायत समिती पारनेर यांचेकडील प्रस्ताव क्र. अ-३/३३४/२०२६, दि.१३/०४/२०२६
१३.मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.अहमदनगर यांचेकडील मंजूर टिपणी दि. २४/०९/२०२६

## आदेश

उपरोक्त संदर्भ क्र.११ अन्वये, मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त शासन निर्णयामधील नमूद केलेल्या तरतुदीनुसार मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) खालील नमूद केलेल्या दिव्यांग प्राथमिक शिक्षक यांना मा.जिल्हा शल्य चिकित्सक,सामान्य रुग्णालय,अहिल्यानगर यांनी दिलेले अपंग प्रमाणपत्र हे संबंधित कर्मचारी हे शारिरीकदृष्टया अपंग असल्याचे प्रमाणित केलेले आहे. वैदयकिय अधिका-याने आपल्या शिफारस पत्रात ज्या तारखेपासुन अशा कर्मचा-यास अपंगत्व आल्याचे प्रमाणित केले त्या तारखेपासुन किंवा त्यांच्या शासकिय सलग सेवेच्या नेमणुकीच्या तारखेपासुन यातील जी तारीख नंतर असेल तेव्हापासून संबंधित कर्मचा-यास वाहतुक भत्ता (विशेष वाहन भत्ता ) मंजूर करण्यात येत आहे.

| अ. नं | अपंग शिक्षकाचे नाव | तालुका | नियुक्ती दिनांक | ऑनलाईन अपंग प्रमाणपत्र दिनांक | अपंगत्वाचा प्रकार व टक्केवारी | अपंग वाहन भत्ता मंजुरीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.लेंभे कैलास रामदास | पारनेर | ०१/०३/२०१४ | १५/४/२०२५ | ४० टक्के अल्पदृष्टी | १५/०४/२०२५ |

**अटी व शर्ती :-**

१) कर्तव्यस्थान असलेल्या एक किलोमीटर अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान आणि निवासस्थान एकत्र परिससरात शासकीय निवासस्थान पुरविण्यात आलेल्या कर्मचा-यांना हा वाहन भत्ता अनुज्ञेय असणार नाही. (टिप- वाहन भत्त्याचे प्रदान संबंधित कर्मचा-यांचे त्याला पुरविण्यात आलेले शासकीय निवासस्थान कर्तव्य स्थानापासुन एक किलोमीटरच्या अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान व निवासस्थान यांच्या एकत्र परिसरात नाही असे आशयाचे प्रमाणपत्र देण्यात अधिन राहुन वाहनभत्ता मंजुर करण्यात येईल.)
२) ज्या कर्मचा-यांना शासकीय वाहतुक पुरविण्यात आली त्यांना वाहनभत्ता अनुज्ञेय असणार नाही.
३) अस्थिव्यंगामुळे अधु असलेल्या शासकीय कर्मचा-याला वरच्या अथवा खालच्या अवयवाची मिळुन किमान ४० टक्के कायम स्वरुपाची अंशिक विकलांगता असावी किंवा वरच्या अथवा खालच्या अवयवाची मिळुन किमान ५० टक्के कायम स्वरुपाची आंशिक विकलांगता असावी.

४) शासकीय कर्मचा-यांची दोन्ही डोळयाची दृष्टी ३/६० पेक्षा कमी असावी अथवा क्षेत्रदृष्टी १० अंशापेक्षा कमी परंतु एका डोळयाने अंध असलेला शासकिय कर्मचारी या आदेशाच्या प्रयोजनार्थ अंध मानण्यात येऊ नयेत.

५) शासकीय कर्मचा-यास पाठीच्या कण्याच्या विकाराने ४० टक्के पेक्षा अधिक कायमचे आंशिक अपंगत्व आलेले असावे.

६) वैदयकिय अधिका-याने आपल्या शिफारस पत्रात ज्या तारखेपासुन अशा कर्मचा-यास अपंगत्व आल्याचे प्रमाणित केले असल्यास त्या तारखेपासुन किंवा त्यांच्या शासकीय सलग सेवेतील नेमणुकीच्या तारखेपासुन यातील जी तारीख नंतर असेल तेव्हापासुन विभागप्रमुखांनी संबंधित कर्मचा-यास वाहतुक भत्ता मंजुर करावा.

७) सदर वाहतुक भत्ता हा रजा,प्रशिक्षण,दौरा इत्यादी कारणामुळे ३० दिवसापेक्षा जास्त अनुपस्थितीच्या कालावधीसाठी अनुज्ञेय असणार नाही.

८) अपंग वाहनभत्ता लाभ देण्याअगोदर संबंधित अपंग शिक्षकांकडुन रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर भविष्यात लेखा परिक्षणामध्ये वसुली निघाल्यास ती भरण्यात मी तयार असल्याबाबतचे हमीपत्र घेण्यात येऊन त्याबाबतची नोंद मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

९) सदर दिव्यांग शिक्षकांना वाहन भत्ता देण्यापुर्वी सदर दिव्यांग शिक्षक आपले अधिनस्त आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करुन अपंग वाहन भत्ता चालु करणेत यावा.

१०) मुक बधीर व कर्ण बधीर कर्मचा-यांना शासन निर्णय दि.३/६/२०२१४ व ४/६/२०२१४ तसेच दि.१० ऑगस्ट २०१५ मधिल सुचना शर्ती व अटी प्रमाणे वाहतुक भत्ता अदा करण्याची कार्यवाही करावी.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणकीय संकेतांक २०२६१००६१६००७९ असा आहे

(भास्कर पाटील)
**शिक्षणाधिकारी प्राथमिक**
**जिल्हा परिषद,अहिल्यानगर**

प्रति,

१. श्री.लेंभे कैलास रामदास ,उपा.जि.प.प्राथ.शाळा आंबेमळा (वडगाव सावताळ) ता.पारनेर व्दारा-गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती पारनेर

२. गटशिक्षणाधिकारी,पंचायत समिती पारनेर यांना कार्यवाहीसाठी सादर

प्रत- माहितीस्तव सविनय सादर

१ .मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर